# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/8626

दिनांक :- 27 DEC 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित

पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/संकीर्ण-२५/२०१७/१३१२ दिनांक २०/१२/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, शासन सेवेतील विविध पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षांचे आयोजन करण्यात येते. सदर परीक्षेकरीता परीक्षा केंद्र निश्चित करण्याकरीता आयोगाच्या मागणीनुसार कॉलेजांची उपलब्धता करून देण्याबाबत सुचना जारी करण्यात आल्या आहेत. मात्र काही संस्था परीक्षेच्या आयोजनाकरीता सहकार्य करीत नसल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निदर्शनास आले असल्याचे सदरील पत्रात नमुद केलेले आहे.

आयोगामार्फत परीक्षांचे आयोजन हे शक्यतो सार्वजनिक सुटटीच्या दिवशी केले जाते. सदर परीक्षेकरीता महाविद्यालयातील फक्त वर्गखोल्यांची आवश्यकता असते. परीक्षेचा कालावधीही फक्त काही तासांचा असतो. त्याचप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार सेवाशुल्क (प्रति उमेदवार रु.८/- प्रमाणे) अदा केले जाते.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता आयोगाच्या अथवा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार महाविद्यालये उपलब्ध करून देण्यात यावीत. आयोगाच्या परीक्षांचे आयोजन ही संवेदनशिल व अत्यावश्यक बाब असल्यामुळे आपणांकडून संबंधित यंत्रणेस सहकार्य करण्यात यावे.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.